


# अमर हिंद मंडळ

## दादर

**स्थापना : २६ जानेवारी १९४७**

सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई)

संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९

## ६७ वा वार्षिक अहवाल

**२०१३-२०१४**


अमरवाडी, गोखले पथ (उत्तर),

दादर, मुंबई-४०० ०२८.

दूरध्वनी : २४२२ ३५ ८९

www.amarhindmandal.com

Email : amarhindmandal@rediffmail.com


६६ वी वसंत व्याख्यानमाला

फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर


## विश्वस्त मंडळ आणि कार्यकारी समिती


दिनकर शंकर पाटील
विश्वस्त


उषा शशिकांत मेहता
विश्वस्त



रमेश माधवराव वरळीकर
विश्वस्त


वसंत बाबाजी भालेकर
अध्यक्ष


भास्कर जयराम सावंत
उपाध्यक्ष


उर्मिला उमेश शेणॉय
उपाध्यक्ष


दीपक नारायण पडते
कार्याध्यक्ष



अरुण अनंत देशपांडे
कार्योपाध्यक्ष


दत्ता अनंत सावंत
कार्यवाह


सतीश शरश्चंद्र रेडीज
संयुक्त कार्यवाह


श्रीकृष्ण शंकर राणे
कोषाध्यक्ष


चिंतामणी विश्वनाथ नागले
कार्यकारी सदस्य


संजय विठ्ठल पेडणेकर
कार्यकारी सदस्य


विजय प्रताप राणे
कार्यकारी सदस्य


प्रफुल्ल दामोदर पाटील
कार्यकारी सदस्य


दीपक नारायण नाडकर्णी
कार्यकारी सदस्य


सीमा चंद्रशेखर कोल्हटकर
कार्यकारी सदस्य


विलास प्रभाकर कारेकर
कार्यकारी सदस्य (स्वीकृत)

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४

### ❖ विश्वस्त मंडळ ❖


दिनकर पाटील उषा मेहता रमेश वरळीकर

अध्यक्ष : वसंत भालेकर

उपाध्यक्ष : भास्कर सावंत

उर्मिला शेणॉय


### ❖ कार्यकारी समिती ❖


**कार्याध्यक्ष** : चिंतामणी नागले (८.१०.२०१३ पर्यंत)

दीपक पडते (८.१०.२०१३ पासून)

**कार्योपाध्यक्ष** : दीपक पडते (८.१०.२०१३ पर्यंत)

अरुण देशपांडे (८.१०.२०१३ पासून)

**कार्यवाह** : अरुण देशपांडे (८.१०.२०१३ पर्यंत)

दत्ता सावंत (८.१०.२०१३ पासून)

**संयुक्त कार्यवाह** : सतीश रेडीज

**कोषाध्यक्ष** : श्रीकृष्ण राणे

**सदस्य** : दत्ता सावंत (८.१०.२०१३ पर्यंत)

चिंतामणी नागले (८.१०.२०१३ पासून)

संजय पेडणेकर

विजय राणे

प्रफुल्ल पाटील

सीमा कोल्हटकर

दीपक नाडकर्णी

**सदस्य (स्वीकृत)** : श्री. विलास कारेकर

# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई - ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २१/०९/२०१४ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष वसंत भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :-

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन २०१३-२०१४ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन २०१३-२०१४ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.

४. सन २०१४-२०१५ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५. सन २०१४- २०१५ चे अंदाजपत्रक मंजूर करणे. (परिशिष्ट ब)

६. निधीत रक्कम वर्ग करण्याबाबत ठराव मंजूर करणे.

७. कार्यकारी समितीतील फेरबदलास मंजूरी देणे.

८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

दत्ता सावंत

दिनांक : १२/०८/२०१४ कार्यवाह

---

**सूचना :**

१) गणपूर्तीचे अभावी नियोजितवेळी सभा सुरु न झाल्यास सभा स्थगित करण्यात येईल, ही स्थगित सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी १०.३० वा. भरेल व ही सभा पूर्णपणे वैध असेल.

२) सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक, संस्थेच्या कामकाजासंबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०१४ पर्यंत सायं. ६ ते ८ या वेळेत (रविवारव्यतिरिक्त) सादर करावेत.

३) सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत तसेच हयात नसलेल्या सभासदांच्या संबंधितांनी तत्सबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

४) सर्वसाधारण सभेसाठी येताना कृपया हा अहवाल सोबत घेऊन यावा.

# वार्षिक अहवाल

## (१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४)

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

सादर वंदे,

मंडळाचा ६७ वा वार्षिक अहवाल जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणास सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

दि. २६ जानेवारी २०१४ रोजी मंडळाच्या स्थापनेला ६७ वर्ष पूर्ण झाली. प्रजासत्ताकदिनाचे ध्वजारोहण आणि वर्धापनदिनानिमित्त स्नेहसंमेलनाचे आयोजन यावर्षी प्रथमच सलगपणे केले होते या कल्पनेला आपण उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिलात आणि कार्यक्रम यशस्वी केलात. सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे पाऊल म्हणजे मंडळाच्या परिसरात सी. सी. टी. व्ही. कॅमेरांची यंत्रणा बसविण्यात आली आहे. नूतनीकरणावर तसेच डागडुजीवर लक्ष केंद्रित करताना व्यासपीठाचा दर्शनीभाग सुशोभित करण्यात आला आहे. नेपाळ येथे झालेल्या लंगडी प्रदर्शनीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी निवड झालेल्या खेळाडूंचा खर्च मंडळाने केला. आंतरशालेय कबड्डी, खोखो, लंगडी स्पर्धा आणि मॅटवरील राज्यस्तरीय कुमार कबड्डी स्पर्धा आयोजित केली. मंडळ आयोजित करीत असलेल्या कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धांमध्ये अहवाल काळात सातत्य राखण्यात आले आहे. मंडळ कला, क्रीडा, शैक्षणिक, वैद्यकीय, समाज कल्याण क्षेत्रातील उपक्रमांद्वारे आपली प्रतिमा अधिक समाजोपयोगी करण्याचा प्रयत्न करीत आहे.

## मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे :-

**सभा :-** अहवाल कालावधीत समितीच्या १० सभा झाल्या आणि विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारी समिती यांच्या ७ संयुक्त सभा झाल्या (कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट 'अ' पहावे.)

**मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा :-** मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २२ सप्टेंबर २०१३ रोजी संपन्न झाली. या सभेस एकूण ८४ तहहयात सभासद उपस्थित होते.

**तहहयात सभासद :-** अहवाल काळात नवीन तहहयात सभासद करुन घेण्यात आले नाहीत. मंडळाची दि. ३१ मार्च २०१४ रोजीची सभासद संख्या ४४० आहे.

**विगतवारी निधी :-** अहवाल काळात क्रीडा निधीत १,००,०००/-, वैद्यकीय निधीत २,००,०००/-, शैक्षणिक निधीत ३,००,०००/-, समाज कल्याण निधीत १,५०,०००/- एकूण ७,५०,०००/- (रुपये सात लाख पन्नास हजार फक्त) वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था :-** १ जानेवारी २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीसाठी "मयुर केटरर्स" यांना संपूर्ण केटरिंग, डेकोरेशन व्यवस्थेसाठी ठेकेदारी देण्यात आली.

# -: उपक्रम आणि कार्यक्रम :-

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रम/ उपक्रमांचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १. | २१ एप्रिल २०१३ | ६६ वी वसंत व्याख्यानमाला | उद्घाटक, वक्ते : डॉ. रामदास भटकळ<br>विषय : दोन महात्मे |
| | २२ एप्रिल २०१३ | | वक्ते : कमांडर श्री. दिलीप दोंदे<br>मुलाखतकार श्री. श्रीराम केळकर<br>शिडाच्या बोटीतून जग प्रवासाचा अनुभव |
| | २३ एप्रिल २०१३ | | वक्ते : डॉ. अच्युत गोडबोले<br>माझा लेखन प्रवास |
| | २४ एप्रिल २०१३ | | वक्ते : श्रीमती पुष्पा भावे<br>भारत व शेजारील देशांचे संबंध |
| | २५ एप्रिल २०१३ | | वक्ते : श्री. विश्वास नांगरेपाटील<br>युवक दशा आणि दिशा |
| | २६ एप्रिल २०१३ | | वक्ते : डॉ. सदानंद मोरे<br>असा घडला महाराष्ट्र |
| | २७ एप्रिल २०१३ | | वक्ते : डॉ. शफाअत खान<br>नाटक एक अनुभव |
| | २८ एप्रिल २०१३ | | सादरकर्ते : डॉ. घन:श्याम बोरकर<br>सहभाग : श्री. रामदास कामत,<br>वैशाली जुन्द्रे, अमृता काळे<br>घन बरसे रे – कविवर्य बा. भ. बोरकर<br>यांच्या कविता व गीतांवर संगीत कार्यक्रम |
| २ | १४ एप्रिल ते<br>२८ एप्रिल २०१३ | बालनाट्य प्रशिक्षण कार्यशाळा | ८ ते १६ वयोगटातील मुलांसाठी बालनाट्य प्रशिक्षण |
| ३ | ०१ मे २०१३ | स्नेहमेळावा | मंडळाच्या तहहयात सभासद, खेळाडू, कार्यकर्ते, हितचिंतक यांच्यासाठी प्रपोजल या नाटकाचा प्रयोग |
| ४ | ०९ मे २०१३ | सांस्कृतिक अमावस्या | श्री. श्रीकांत रानडे यांचा नाट्यभाव सुगम संगीत गायनाचा कार्यक्रम |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमांचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| ५ | ३१ जुलै २०१३ | महमद रफींची गाणी | ध्वनीमुद्रित गाण्यांची श्रवण मैफिल |
| ६ | १५ ऑगस्ट २०१३ | 'स्वातंत्र्यदिन' व कै. म.ज.फडके स्मृती | प्रमुख पाहुणे :- श्री. भास्कर सावंत<br>गुणवंत खेळाडू व कलाकारांचा गुणगौरव |
| ७ | १७ ऑगस्ट २०१३ | 'भाग मिल्खा भाग' | सुप्रसिद्ध धावपटू मिल्खा सिंग यांच्या चरित्रावरील चित्रपट |
| ८ | २८ सप्टें. ते ३० सप्टें.२०१३<br><br>१२ ऑक्टो.२०१३ | कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा<br><br>कै. विनोद हडप राज्यस्तरीय एकांकिका लेखन स्पर्धा | प्राथ.फेरी परीक्षक : श्री. अद्वैत दादरकर, श्री. चंद्रकांत मेहेंदळे<br>अंतिम फेरी : श्री शिवाजी मंदिर येथे<br>परीक्षक : श्री. कुमार सोहोनी, श्रीमती प्रतिभा मतकरी, श्री. वामन तावडे<br>प्रथम : इ = एमसी स्केअर<br>द्वितीय : रिदम ऑफ लव, तृतिय : फॅमेली बिझनेस<br>परीक्षक : श्री. संजय डहाळे, श्रीमती प्रतिभा पाटील<br>प्रथम : कुमार बडगुजर, द्वितीय : योगेश नार्वेकर, तृतिय : प्रभाकर म्हसकर, |
| ९ | १ ऑक्टो. २०१३ | ज्येष्ठ नागरिक दिन | 'भावलेली गीते' ध्वनीमुद्रित गाण्यांची श्रवण मैफिल |
| १० | २९ नोव्हें.२०१३ | राज्यनाट्य स्पर्धा | काककथा : एतद सत्यंम् |
| ११ | २६ डिसें. २०१३ | राज्य बालनाट्य स्पर्धा | शाळा की मरण |
| १२ | २,३,४ जाने.२०१४ व ६ एप्रिल २०१४ | शालेय क्रीडा स्पर्धा आंतरशालेय कबड्डी, खो-खो, लंगडी स्पर्धा | कबड्डी : उद्घाटक मा. श्रीमती नंदा खाडे<br>बक्षिस समारंभ : मा. श्रीमती सीमा केळकर<br>खोखो उद्घाटक : मा. श्रीमती मिनल मालवणकर<br>बक्षिस समारंभ : मा. श्री. रमाकांत शिंदे<br>लंगडी उद्घाटक : मा. श्रीमती अपर्णा वैद्य राऊत<br>बक्षिस समारंभ : मा. श्री. शिवकुमार लाड |
| १३ | २६ जाने. २०१४ | प्रजासत्ताक दिन व वर्धापनदिन | प्रमुख पाहुणे : श्री. लक्ष्मणराव कदम<br>रविराज नर यांचा वाद्यवृंद |
| १४ | २६ जाने. २०१४ ते २९ जाने. २०१४ | मॅटवरील कुमारगट कबड्डी स्पर्धा | विजेता : पंचवटी स्पोर्टस् क्लब, घाटकोपर<br>उपविजेता : पार्ले स्पोर्टस् क्लब, पार्ले |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमांचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १५ | ९ फेब्रु. २०१४ | कै. उमेश शेणॉय राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा | प्रमुख पाहुणे : श्रीमती ईला भाटे<br>परीक्षक : श्री. नरेंद्रकुमार विसपुते, श्री. भास्कर सावंत, श्रीमती आरती कदम<br>प्रथम : आरती पोटफोडे, द्वितीय : मुग्धा जोशी<br>तृतीय : काजल बोरसे |
| १६ | १ मार्च २०१४ | सांस्कृतिक अमावस्या | श्रीमती लेले यांचा भरतनाट्यम् कार्यक्रम |
| १७ | ७ मार्च२०१४ | आरोग्य सल्ला | अहिंमं व शुश्रुषा हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी आरोग्य शिबीर |
| १८ | २१मार्च २०१४ | आरोग्य सल्ला | अहिंमं व शुश्रुषा हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबीर |
| १९ | ३० मार्च २०१४ | सांस्कृतिक अमावस्या | वसंताची गाणी ध्वनीमुद्रित गाण्यांची श्रवण मैफिल |

## क्रीडा विभाग

**कबड्डी महिला संघ :–**

**जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक :–**

- गणेश गल्ली स्पोर्टस् क्लब
- राष्ट्रवादी कॉंग्रेस डीलाईल रोड
- राम सेवक क्रीडा मंडळ
- तेली गल्ली स्पोर्टस् क्लब, चिंचपोकळी
- काळाचौकी क्रीडा मंडळ, काळाचौकी
- शिरोडकर स्पोर्टस् क्लब, परळ

**जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांमध्ये द्वितीय क्रमांक :–**

- श्रमिक जिमखाना, डीलाईलरोड
- धारावी स्पोर्टस् क्लब, धारावी
- यंग उमरखाडी स्पो. क्लब, उमरखाडी

**वरील स्पर्धांमध्ये खालील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली व विविध बक्षिसांचे मानकरी ठरले.**

दीप्ती पारकर, हर्षदा ढेंगे, तेजस्विनी पोटे, प्राजक्ता कांबळी, प्रियांका कोठेकर, तेजश्री सारंग, पूजा पाटील

**संघामध्ये निवड :**

**मुंबई शहर महिला संघ** : दिप्ती पारकर, हर्षदा ढेंगे, प्रियांका कोठेकर, पूजा पाटील

**मुंबई शहर कुमारी संघ** : तेजस्विनी पोटे (कर्णधार), तेजश्री सारंग

**मुंबई विद्यापीठ संघ** : पूजा पाटील, हर्षदा ढेंगे, प्रियांका कोठेकर, तेजस्विनी पोटे.

मंडळाच्या संघाचे मार्गदर्शन व नियमित सराव याची जबाबदारी **विजय राणे, विलास कारेकर** यांनी सांभाळली.

**कबड्डी पुरुष संघ :–**

- नांदेड, हेगालूर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक
- बीड, केज येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक
- कणकवली येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक
- वीर संताजी क्रीडा मंडळ आयोजित जिल्हाराज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक

**कबड्डी कुमार संघ**

- यंग प्रभादेवी आयोजित जिल्हाराज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक
- श्री साई स्पोर्ट क्लब आयोजित जिल्हाराज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक

**वरील स्पर्धांमध्ये खालील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली व विविध बक्षिसांचे मानकरी ठरले.**

साईनाथ काळसेकर, अमित चव्हाण, प्रसाद गुरव, नीलेश पवार, नीलेश सकपाळ, दिनेश बापर्डेकर, अक्षय शेवडे, अक्षय कारकर, अनिकेत पेवेकर, केतन नलावडे, रुपेश शेलार

**संघामध्ये निवड :–**

- **मुंबई शहर पुरुष संघ :** साईनाथ काळसेकर
- **मुंबई शहर कुमार गट संघ :** दिनेश बापर्डेकर, नीलेश सकपाळ
- **मुंबई शहर किशोर गट संघ:** अनिकेत पेवेकर
- **मुंबई विद्यापीठ संघ :** अमित चव्हाण

**मंडळाने अहवाल काळात आयोजित केलेल्या स्पर्धा :–**

- **आंतरशालेय कबड्डी स्पर्धा (मुले व मुली)**
- मुले – अंतिम विजयी – प्रभादेवी म्यु. हायस्कूल, प्रभादेवी
- मुली – अंतिम विजयी – बालमोहन विद्यामंदिर, दादर

- **मॅटवरील राज्यस्तरीय कुमार गट कबड्डी स्पर्धा**
- अंतिम विजयी – पंचवटी स्पोर्टस् क्लब, घाटकोपर
- अंतिम उपविजयी – पार्ले स्पोर्टस् क्लब, पार्ले

संघाचे मार्गदर्शन व नियमित सराव याची जबाबदारी **विजय राणे, विलास कारेकर, साईनाथ काळसेकर** यांनी सांभाळली.

## खो - खो

**कुमार/कुमारी मुंबई शहर जिल्हाअंजिक्यपद निवडचाचणी खो–खो स्पर्धा २०१३–१४**

दि. २४ ते २६ एप्रिल २०१३ या दरम्यान विजय क्लब येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत कुमार संघाने द्वितीय क्रमांक तर कुमारी संघाने तृतीय क्रमांक संपादन केला. सदर स्पर्धेत **केदार शिवलकर** याला उत्कृष्ट आक्रमकाचे पारितोषिक देण्यात आले.

**साई इलेक्ट्रॉनिक आयोजित कुमार/कुमारी निमंत्रित जिल्हास्तरीय खो–खो स्पर्धा २०१३–१४**

दि. ३१ मे ते २ जून २०१३ दरम्यान राऊळ मैदान, दादर येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत कुमार संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच **प्रसाद राडिये** हा सर्वोत्कृष्ट आक्रमक ठरला.

**कुमार-कुमारी राज्यअजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा - २०१३-२०१४**

दि. २ ते ५ मे २०१३ दरम्यान रोहा, (रायगड) येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मुंबई शहर कुमारांच्या संघाला द्वितीय क्रमांक मिळाला. मंडळाचा खेळाडू **केदार शिवलकर** हा मुंबई संघाचा उपकर्णधार होता. **प्रसाद राडिये** याला अष्टपैलू खेळाडूचे पारितोषिक मिळाले.या स्पर्धेसाठी मुंबईच्या कुमार संघात **प्रसाद राडिये, आदेश कागडा, केदार शिवलकर** तर कुमारी संघात **तन्वी उपळकर, प्राची सुर्वे, मधुरा पेडणेकर** यांची निवड झाली होती.

मुंबई जिल्हा किशोरी संघाचे **प्रशिक्षक** म्हणून **जतिन टाकळे** यांची निवड करण्यात आली होती. तसेच **प्रफुल्ल पाटील** यांची मुंबई जिल्हा किशोर संघाचे **व्यवस्थापक** म्हणून निवड करण्यात आली होती.

**३३ वी कुमार/कुमारी राष्ट्रीय खो-खो स्पर्धा २०१३-१४**

दि. ७ ते ११ ऑक्टोबर २०१३ दरम्यान सोलन (हिमाचल प्रदेश) येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या कुमार संघाने प्रथम पारितोषिक पटकावले. महाराष्ट्राच्या कुमार संघात **प्रसाद राडिये, आदेश कागडा** यांची निवड झाली होती.

**३० वी किशोर-किशोरी राज्यअजिंक्यपद व निवडचाचणी स्पर्धा - २०१३-१४**

दि. २१ ते २४ नोव्हेंबर २०१३ दरम्यान वेंगुर्ला, सिंधुदुर्ग येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी मुंबईच्या किशोरी संघात **संजना कुडव, भक्ती लाड** तर किशोर संघात **करण बरई** यांची निवड झाली होती.

**५० वी पुरुष/महिला राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा २०१३-२०१४**

दि. ५ ते ८ डिसेंबर २०१३ दरम्यान सोलापूर, महाराष्ट्र येथे ही स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत मुंबई शहर पुरुष संघाने द्वितीय पारितोषिक पटकावले. या स्पर्धेसाठी मुंबई शहर पुरुष संघात **आदेश कागडा** तर महिला संघात **श्रद्धा नमसले** यांची निवड झाली होती.

**२४ वी पुरुष/महिला राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा २०१३-२०१४**

दि.७ ते ८ डिसेंबर २०१३ दरम्यान टुमकुर, कर्नाटक येथे ही स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला संघाने तृतीय तर पुरुष संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या महिला संघात **मधुरा पेडणेकर** तर पुरुष संघात **प्रसाद राडिये** यांची निवड झाली होती.

**५९ वी कुमार/कुमारी शालेय राष्ट्रीय खो-खो - २०१३-१४**

दि. ८ ते १२ जानेवारी २०१४ दरम्यान कोपरगाव, महाराष्ट्र येथे ही स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत महाराष्ट्राच्या कुमार संघाने प्रथम पारितोषिक पटकावले. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या कुमार संघात **प्रसाद राडिये** यांची निवड झाली होती.

**कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा - २०१३-१४**

दि.२ ते ५ मार्च २०१४ दरम्यान रत्नागिरी येथे ही स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत मुंबई शहर पुरुष संघाला तृतीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेसाठी मुंबईच्या संघात **अनिकेत आडारकर, आदेश कागडा** यांची निवड झाली होती.

## लंगडी

### ४ थी राष्ट्रीय पुरुष व महिला अजिंक्यपद स्पर्धा २०१३-१४

दि. १७ ते १९ मे २०१३ या दरम्यान पंजाब युनिव्हर्सिटी, चंदिगढ येथे ही स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष/महिला संघानी दुहेरी मुकुट मिळवला. त्यात मंडळाच्या **अभिषेक कागडा** याला उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचे पारितोषिक मिळाले. महाराष्ट्राच्या पुरुष संघात **अनिकेत आडारकर, अभिषेक कागडा, विनित कागडा, आदेश कागडा, प्रसाद राडिये, नीरव पाटील** तर महिला संघात **मधुरा पेडणेकर, तन्वी उपळकर, प्राची सुर्वे** यांची निवड झाली होती. सदर स्पर्धेतसाठी **नीलेश सावंत** यांची पुरुष संघाचे **व्यवस्थापक** म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

### नेपाळ येथील तीन राष्ट्रांची आंतरराष्ट्रीय लंगडी स्पर्धा २०१३-१४

दि. २७ ते २९ ऑगस्ट २०१३ दरम्यान ही स्पर्धा नेपाळ येथील पोखरा येथे पार पडली. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय पुरुष संघात **अनिकेत आडारकर, अभिषेक कागडा, विनित कागडा, आदेश कागडा, प्रसाद राडिये, नीरव पाटील** तर महिला संघात **मधुरा पेडणेकर, तन्वी उपळकर, प्राची सुर्वे** यांची निवड झाली होती.

### ४ थी राज्यस्तरीय १६ वर्षाखालील लंगडी स्पर्धा २०१३-१४

दि. २ ते ३ ऑक्टोबर २०१३ दरम्यान मालवण सिंधुदुर्ग येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मुंबई शहर मुलींनी प्रथम तर मुलांनी द्वितीय क्रमांक मिळविला. मुंबईच्या कुमार संघात **प्रसाद भाटकर** तर कुमारी संघात **संजना कुडव, प्रियंका चव्हाण** यांची निवड झाली होती.

### ४ थी राज्यस्तरीय पुरुष/महिला अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा २०१३-१४

दि. १४ ते १६ डिसेंबर २०१३ दरम्यान शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मुंबई शहराच्या दोन्ही संघांनी विजेतपद मिळवले. या स्पर्धेसाठी मुंबईच्या पुरुष संघात **अनिकेत आडारकर, अभिषेक कागडा, विनित कागडा, आदेश कागडा, प्रसाद राडिये** तर मुंबईच्या महिला संघात **मधुरा पेडणेकर, तन्वी उपळकर, प्राची सुर्वे** यांची निवड झाली होती. मंडळाच्या **आदेश कागडा** याने उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचे पारितोषिक पटकावले.

### ५ वी राष्ट्रीय पुरुष/महिला अजिंक्यपद स्पर्धा २०१३-१४

दि. २७ ते दि. २९ डिसेंबर २०१३ दरम्यान तामिळनाडूतील तिरपूर येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी उपविजेतपद मिळवले. महाराष्ट्राच्या संघाचे कर्णधारपद **अभिषेक कागडा** यांनी भूषविले. तर **अनिकेत आडारकर** याने उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचे पारितोषिक पटकावले. महाराष्ट्राच्या संघात मंडळाच्या **अनिकेत आडारकर, अभिषेक कागडा, विनित कागडा, कुणाल बापर्डेकर, हर्षल महाडिक, ओमकार ठाकूर, नीरव पाटील** तर महिला संघात **प्राची सुर्वे** यांची निवड झाली होती.

### ३ री १४ वर्षाखालील लंगडी राज्यअजिंक्यपद स्पर्धा २०१३–१४

दि. १८ ते १९ जानेवारी २०१४ दरम्यान सांगोला सोलापूर येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मुंबई शहर किशोर संघात **मनिष कांबळे, अग्रेय ठाकुरदेसाई** तर किशोरी संघात **रेवती कांबळे, भक्ती लाड, संजना कुडव** यांची निवड झाली होती या स्पर्धेत मुलींनी प्रथम तर मुलांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

### ४ थी सब ज्युनिअर राष्ट्रीय अजिंक्यपद लंगडी स्पर्धा २०१३–१४

दि. १ ते ३ फेब्रु. २०१४ दरम्यान टिटवाळा येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोर संघात **मनीष कांबळे, अग्रेय ठाकुरदेसाई** तर किशोरी संघात **भक्ती लाड, संजना कुडव** यांची निवड झाली होती. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोरी संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

खो–खो आणि लंगडी या खेळाचे दैनंदिन सराव प्रशिक्षक : **जतिन टाकळे, रोहन चव्हाण, अमित चिखलकर.** मार्गदर्शक : **संजय पेडणेकर.**

**मंडळाने अहवाल काळात आयोजित केलेल्या स्पर्धा :–**

- **आंतर शालेय खो–खो स्पर्धा (मुले व मुली)**
- **आंतर शालेय लंगडी स्पर्धा (मुले व मुली)**

## कलाविभाग

महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत **एतद सत्यम्** अर्थात काककथा हे नाटक सादर केले.

महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत **अभ्यास की मरण** हे बालनाट्य सादर केले.

अद्वैत, उंबरठा, गिरगांव करंडक या स्पर्धांमध्ये **पाऊसपण** ही एकांकिका सादर केली.

आकाशवाणी मुंबई येथे **पर्यावरण विषयक** नभो नाट्य सादर केले.

कोकण साहित्य परिषद, देवनार येथे **नाट्य अभिवाचनात** भाग घेतला.

**मंडळाने अहवाल काळात आयोजित केलेल्या स्पर्धा :–**

**कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा**

**कै. विनोद हडप राज्यस्तरीय लेखन स्पर्धा**

**कै. उमेश शेणॉय राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा**

सीमा पारकर, चंदन जमदाडे, अमित सोलंकी, भूषण गमरे, लीला हडप, हेमा घरत, जितेंद्र आगरकर, गीतांजली राणे, सिद्धार्थ मोकळे इत्यादींचा सहभाग व मार्गदर्शन.

## –: विशेष अभिनंदनीय :–

**नियुक्ती** : अरुण देशपांडे – कार्याध्यक्ष, संजय पेडणेकर – सदस्य, मुंबई लंगडी असोसिएशन ● दत्ता सावंत – परीक्षक, महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा, कल्याण केंद्र ● प्रफुल्ल पाटील मुंबई खो खो संघटना ● जतीन टाकळे – मुंबई खोखो सब ज्यू. संघ प्रशिक्षक, मुंबई जिल्हा पंच प्रमुख.

**निवड** : नीलेश, संतोष पवार, तेजस्विनी पोटे – महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद चाचणी मुंबई शहर ● करन बराई, संजना कुडव, भक्ती लाड, रेवती कांबळे, किशोर–किशोरी खो खो राज्य अजि. चाचणी, मुंबई शहर

## सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय आणि सांस्कृतिक कार्य करणाऱ्या समाजसेवी संस्थांना विनामूल्य / सवलतीच्या दरात सभागृह

• पुस्तक प्रकाशन – ''आम्ही बी घडलो'' – रामदास कामत • महाराष्ट्र खो खो असोसिएशन – सराव
• 'ओढ हिरवळीची' प्रकाशन सोहळा • मृणाल गोरे कौटुंबिक सल्ला मदत केंद्र – महिला दिन
• दादर माहिम विभाग नागरी समिती – सभा • जतीन टाकळे – वाढदिवस
• अजित राणे, राष्ट्रवादी काँग्रेस – सभा • साईनाथ काळसेकर – मुलाचा नामकरण विधी
• भाटिया भुवन सार्व. गणेशोत्सव मंडळ – स्पर्धा • गिरीश धानुरकर मनसे – सभा
• परब मराठा समाज – स्नेहसंमेलन • नाईक मराठा मंडळ – स्नेहसंमेलन
• सी.के.पी. एज्युकेशन सोसायटी – सी. डी. देशमुख आर्थिक विचारमंच • मावा संघटना – स्नेहसंमेलन
• शिवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ – स्नेहसंमेलन • ब्रह्मविद्या साधक संघ – स्नेहसंमेलन
• लाईफ वॉच – स्नेहसंमेलन • मुंबई जिल्हा खोखो पंच प्रशिक्षण शिबीर

**वैद्यकीय मदत :** रोहन धानगुतकर, भावेश कदम (मंडळाचे कबड्डी खेळाडू)

**शैक्षणिक मदत :** आदेगाव शाळा, तळवली गटविकास मंडळ

### –: इतर संकीर्ण :–

इंडियन असोसिएशन फॉर हँडीकॅपड्‌ रु. १८००/– देणगी • नेपाळ दौरा ४ मुले व २ मुली प्रवेश फी : ९०,०००/– • खेळाडूंना गणवेश • कर्मचारी गणवेश • सी. सी. टि. व्ही. कॅमेरा खरेदी • नवीन कॉम्प्युटर व प्रिंटर खरेदी • दिवाळी भेटकार्ड • भारतरत्न सचिन तेंडुलकर यांची चित्र चौकट (जिद्द + चिकाटी + मेहनत = भारतरत्न सचिन तेंडुलकर शाळांना भेट म्हणून देण्यात आली.

### –: समारोप :–

दि. ८ ऑक्टोबर २०१३ रोजी कार्यकारी समितीमध्ये काही बदल करण्यात आले. त्यास दि. १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या संयुक्त सभेने मंजुरी दिली याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. याबदलाची माहिती दिवाळी भेटकार्डासोबतच्या पत्राद्वारे आपणांस कळवली होती आपण बदल स्वीकारलात त्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.

मंडळाची सर्व बाजूंनी प्रगती होत असतांना मंडळाचे भविष्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने भावी पिढी तयार करण्यासाठी कार्यकारी समिती प्रयत्नशील आहे. शैक्षणिक, वैद्यकीय, समाजकल्याण निधींचा सुयोग्यपणे आणि नियमित वापर व्हावा यासाठी योजना आखण्याचे काम सुरु झाले आहे. मंडळ आपल्या कला, क्रीडा, शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक निधींचा उपयोग योग्य प्रकारे करीत असल्याचे अहवाल काळातील कार्यक्रमांवरुन आपल्या नक्कीच लक्षात येईल. मंडळाचे क्रीडा विभाग प्रमुख संजय पेडणेकर, विजय राणे आपापली जवाबदारी योग्य प्रकारे पार पाडीत आहेत. त्यांना प्रफुल्ल पाटील, विलास कारेकर, जतिन टाकळे, रोहन चव्हाण, अमित चिखलकर, साईनाथ काळसेकर सहकार्य करीत आहेत.

मंडळाचे कलाविभाग प्रमुख दत्ता सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली लीला हडप, संजय भाटकर, अनंत घोगळे, योगेंद्र माने, सीमा पारकर, चंदन जमदाडे, जितेंद्र आगरकर, अमित सोलंकी, भूषण गमरे

कलाविभागाचे कार्य करीत आहेत. मंडळाचे 'महाभारत, बिटविन द लाईन्स्' हे प्रायोगिक नाटक रंगभूमीवर येत असून पुढील वर्षात त्याचे प्रयोग होणार आहेत.

मंडळाचे लिपिक सुधीर कुळकर्णी, कर्मचारी संदीप चांदे, रविंद्र भुवड यांचे दैनंदिन कामकाजात तसेच वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रम, उपक्रमांत योग्य सहकार्य मिळत आहे.

मयुर कॅटरर्सचे अविनाश पाटील, मयुर पाटील यांचे वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांत व उपक्रमांत मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत. कार्यकारी समितीने सभासदांची माहिती अद्ययावत करण्याचे काम हाती घेतले आहे.

अमर हिंद मंडळाचा कार्यभार सांभाळण्यासाठी तसेच कार्यक्रमांचे आयोजन नीटपणे करण्यासाठी सर्व पदाधिकारी, समिती सदस्य, खेळाडू, कलाकार, कार्यकर्ते येत असतात त्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना आनंद होत आहे. समाजसेवी कार्यामध्ये सहभागी होताना **गणेश पेंडसे यांनी रु. २५०००/- ची देणगी देऊन तसेच श्री. शेट्टी यांनी व्यायामाची साधने देऊन मंडळाला केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.**

अहवाल कालावधीत आयोजित केलेल्या कार्यक्रमांत सहभागी होऊन सभासदांनी केलेले सहकार्य तसेच कार्यकर्ते, हितचिंतक, कलाकार, खेळाडू व मंडळाचे कर्मचारी यांनी केलेले सहकार्य, याचा पुन्हा एकदा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून आणि पुढील वाटचालीत या सर्वांचे सहकार्य मिळेल अशी सदिच्छा व्यक्त करून हा अहवाल समाप्त करीत आहे.

कळावे लोभ असावा आणि तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
**दत्ता सावंत**
कार्यवाह

**-: श्रद्धांजली :-**

अहवाल काळात निधन पावलेले तहहयात सभासद **चंद्रकांत महिंद्रकर, माधुरी फडके** तसेच मंडळाच्या ज्ञात-अज्ञात सभासद, हितचिंतक, कार्यकर्ते यांना अमर हिंद मंडळाची भावपूर्ण श्रद्धांजली

## अमर हिंद मंडळ निर्मित

# महाभारत
BETWEEN THE LINES...

**लेखक : दत्ता सावंत    दिग्दर्शन : पंकज चेंबूरकर**

**कलाकार :** जितेंद्र आगरकर, चंदन जमदाडे, भूषण गमरे, राहुल शिंदे, दिप नाईक, उमेश महाले, केशव देवरे, ऐश्वर्या सक्रे, अमित सोलंकी, ऋतुज कुलकर्णी आणि सीमा घोगळे-पारकर.

**संपर्क : ९८७०१७१०८७/९८७०१४५०३०**




मॅटवरील राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा (कुमारगट)
उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. श्री. रवी करमरकर,
प्रमुख अतिथी मा. श्री. महेश विचारे,
क्रीडा संपादक महाराष्ट्र टाईम्स



आंतरशालेय कबड्डी, खोखो, लंगडी स्पर्धेतील
खोखो स्पर्धेच्या उद्घाटक मा. सौ. नंदा खाडे यांचा
सन्मान करताना उपाध्यक्षा उर्मिला शेणॉय सोबत
कार्यकारी सदस्य चिंतामणी नागले, प्रफुल्ल पाटील



आंतरशालेय लंगडी स्पर्धेच्या पारितोषिक वितरण
समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. श्री. शिवकुमार लाड
यांना सन्मानित करताना उपाध्यक्ष भास्कर सावंत सोबत
मा. श्री. दिनेश सुखानंदि आणि
विश्वस्त रमेश वरळीकर




कै. उमेश शेणॉय राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन
वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात
प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध अभिनेत्री
मा. श्रीमती ईला भाटे आणि
प्रमुख अतिथी मा. श्री. तुळशीदास भोईटे

## Report of an Auditor Relating to Accounts Audited under Sub-Section (2) of Section 33 & 34 and Rule 19 of the Bombay Public Trusts Act.

| | | |
|---|---|---|
| Registration No. | : | F-43 (Mumbai) |
| Name of the Public Trust | : | Amar Hind Mnadal |
| For the year ending | : | 31st March, 2014 |

| | | |
|---|---|---|
| (a) | Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules. | Yes |
| (b) | Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts | Yes |
| (c) | Whether the cash balance and the vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts. | Yes |
| (d) | Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him | Yes |
| (e) | Whether a register or movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office, and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly complied with; | No |
| (f) | Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information required by him | Yes |
| (g) | Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust | No |
| (h) | The amounts of outstandings for more than one year and the amounts written off; if any ; | |
| (i) | Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5000/- | Yes |
| (j) | Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of section 35; | No |
| (k) | Alienations, if any, of the immovable property contrary to the provisions of Section 36 which have come to the notice of the auditor; | No |
| (l) | All case of irregular, illegal or improper expenditure, failure, omision, loss or waste was caused in consequence of breach of trust or mispplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust; | No |
| (m) | Whether the budget has been filed in the form provided by rule 16A; | Yes |
| (n) | Whether the maximum and minimum number of the trustees is maintained | Yes |
| (o) | Whether the meetings are held regularly as provided in such Intrument; | Yes |
| (p) | Whether the minute books of the proceedings of the meeting is maintained | Yes |
| (q) | Whether any of the trustees has any interest in the investment of the trust; | No |
| (r) | Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust; | No |
| (s) | Whether any of the irregularities pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly complied with by the trustees during the period of audit; | NA |
| (t) | Any special matter which the auditor may think fit or neccessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner. | Refer General Observation |

**SARAF GURKAR & ASSOCIATES**
Chartered Accountants
Auditors

Mumbai
Dated : 14/8/2014




दिनांक १५ ऑगस्ट २०१३ भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापनदिन सोहळा, प्रमुख पाहुणे उपाध्यक्ष भास्कर सावंत, विश्वस्त दिनकरराव पाटील, कार्योपाध्यक्ष अरूण देशपांडे, कार्यवाह दत्ता सावंत, सदस्य चिंतामणी नागले




२६ जानेवारी २०१४ भारतीय प्रजासत्ताकदिन सोहळा, प्रमुख पाहुणे मा. श्री. लक्ष्मणराव कदम यांना सन्मानित करीत असताना मंडळाचे विश्वस्त दिनकर पाटील, कार्योपाध्यक्ष अरूण देशपांडे, कोषाध्यक्ष श्रीकृष्ण राणे, सदस्य चिंतामणी नागले.




कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धा, प्रमुख पाहुणे मा. श्री. आशुतोष घोरपडे परीक्षक मा. श्री. कुमार सोहोनी, मा. श्रीमती प्रतिभा मतकरी, मा. श्री. वामन तावडे, मा. श्री. अनंत घोगळे आणि विश्वस्त, कार्यकारी समिती.




आदेगाव यांना मंडळाने दिलेल्या शैक्षणिक मदतीच्या वितरण कार्यक्रमात कार्यवाह दत्ता सावंत.